# समजूत

तुझ्या दर्शना भुकेले माझे नयन
तुझ्या वचना भुकेले माझे श्रवण
तुझ्या स्पर्शाला भुकेले माझे तन
तुझ्या स्मरणा भुकेले माझे मन ||१||

शोधीले सर्वत्र तुझा मागमूस ना
दऱ्या खोऱ्या गुहांत तुझा वास ना
वाळवंटी तीर्थक्षेत्री तू मिळेना
आयु सरली करू काय कळेना ||२||

सुबक तुझी मग मी मूर्ती केली
तिच्यातच तुझी छबी बघितली
आस दर्शन स्पर्शाची भागविली
मी तूच मनाची समजूत घातली ||३||

– नारायण
०८/२६/२३